# प्रस्तावना

आधुनिक भारताच्या प्रारंभकालीन राजकीय धडपडणीत नामदार गोखले यांचे स्थान वैशिष्टयपूर्ण आहे. विधायक स्वरूपाच्या आधुनिक भारतीय प्रबोधन-युगाचे ते प्रणेते होते. न्या. रानडे, दादाभाई नौरोजी आणि महात्मा गांधी यांच्यामधील एक महत्त्वाचा दुवा म्हणूनही गोखले याना विशेष महत्व आहे. जन्माने महाराष्ट्रीय असूनही ज्या व्यक्तिनी भारतातील व भारताबाहेरील सुसंस्कृत व्यक्तिंची व कार्यकर्त्यांची मने आपल्या सौजन्याने वेधून घेतली त्यांत गोखले अग्रस्थानी होते. त्यांच्या तोडीचे अभ्यासू वृत्तीचे फारच थोडे संसदपटू आजवर महाराष्ट्रात जन्माला आले. गोखले यांच्या कर्तृत्वामुळे महाराष्ट्राची प्रतिष्ठा उंचावण्यास फार मोठी मदत झाली आहे.

आजवर गोखले यांच्या कर्तृत्वाची दखल परप्रांतीयाकडून जेवढी आणि जशी घेतली गेली आहे तशी मराठी माणसांकडून घेतली गेलेली नाही. तसेच जी कांही दखल घेतली गेली आहे, ती अपुरी तर आहेच पण त्यात जिव्हाळ्याचा अभावही जाणवतो. गोखले त्यांच्या ह्यातीत नव्हे तर त्यांच्या निधनानंतरही त्यांचे कर्तृत्व महाराष्ट्रापुढे आले नाही. त्यामुळे त्यांच्या कर्तृत्वाची दखल घेणे गरजेचे वाटते.

ना. गोखले यांच्या राजकीय विचारांचा अभ्यास करण्यापूर्वी १९ व्या शतकांतील भारतातील परिस्थिती कशाप्रकारची होती हे पाहणे आवश्यक आहे. त्यावेळी भारताची सामाजिक, आर्थिक व धार्मिक क्षेत्रात कमालीची अधोगती झाली होती. बालविवाह, बहूपत्नीपध्दती, अस्पृश्यता, हुंडापध्दती या-सारख्या अनेक जाचक प्रथा होत्या. समाजात अस्तित्वात असलेली जातीव्यवस्था कर्तृत्वावर आधारलेली नसून जन्मावर आधारलेली होती. स्त्रियांना समाजात आणि कुटुंबात दुय्यम दर्जाचे स्थान होते. धर्माचे सोपे तत्त्वज्ञान लोप पावून

कर्मकांडाना अवास्तव महत्त्व प्राप्त झाले होते. सर्वत्र अंधश्रध्दामय असे वातावरण होते. त्यामुळे समाजाचा विकास पूर्णपणे थांबलेला होता.

महाराष्ट्रामध्येही समाजजीवनांत वर्णव्यवस्था खोलवर रुजली होती. सामाजिक व्यवस्थेत प्रत्येक व्यक्तिला विशिष्ट स्थान प्राप्त झाले होते व त्या स्थानानुसार प्रत्येक जातीला हक्क आणि कर्तव्ये मिळाली होती. जातीव्यवस्थेची बंधने तोडणाऱ्या व्यक्तीला समाजबहिष्कृत केले जात असे.

देशात इंग्रजी सत्तेची झालेली स्थापना ही अत्यंत महत्त्वपूर्ण घटना होती. ब्रिटिशांच्या आगमनामुळे देशाच्या सामाजिक, आर्थिक व राजकीय जीवनांत अनेक बदल घडू लागले. ब्रिटिश राजवटीने या देशात नवे विचार आणले. भौतिक सुधारणा घडवून आणल्या. भारतीयांचा प्रगत जगाशी संपर्क प्रस्थापित केला आणि येथील जनतेला नवी दृष्टी प्राप्त करून दिली. थोडक्यात ब्रिटिश राजवटीचे जीवनाच्या सर्व क्षेत्रावर दूरगामी परिणाम घडून आले. याचा अर्थ ब्रिटिश राजवटीचे प्रतिकूल परिणाम भारतीयांना भोगावे लागले नाहीत, असा नाही. पण या देशाला परिवर्तनाच्या एका नव्या टप्प्यावर आणून ठेवण्याचे कार्य या राजवटीतच झाले हे निर्विवाद सत्य आहे.

आपल्या देशावर परकियांचे राज्य असावे यांचा गोखल्यांना मनापासून तिरस्कार होता. पण हिंदी समाजापुढील सर्वच समस्या ब्रिटिशांच्या राजवटीमुळे उत्पन्न झालेल्या आहेत असे त्यांचे मत नव्हते. ब्रिटिशांच्या गुलामगिरीतून हिंदी लोकांनी मुक्त व्हावे यासाठी तर त्यांचा प्रयत्न होताच, पण ज्या दोषांमुळे देशावर पारतंत्र्याची वेळ आली ते दोषही नष्ट व्हावे असे त्यांना वाटत होते. ब्रिटिशांबरोबर आपला जो संपर्क आला आहे त्याचा फायदा उठवून हिंदुस्थानात इहवादी, आधुनिक व लोकशाहीसंपन्न राष्ट्राची उभारणी करावी, अशी गोखल्यांची भूमिका होती.

ब्रिटिशांच्यामुळे देशात अनेक प्रकारच्या सुधारणा होत होत्या. असा

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

वेळी पूर्ण स्वातंत्र्याची मागणी करणे अयोग्य ठरेल असे ना. गोखले यांचे मत होते. भारतीय राजकारणातील क्रांतीकारक व जहाल मार्ग त्यांना पसंत नव्हते. ब्रिटिशाबरोबरीच्या संबंधामुळे भारताला अनेक फायदे झाले आहेत व होत राहतील अशी त्यांची कल्पना होती. कायद्यासमोर सर्व व्यक्ती समान मानल्या जातात हे तत्त्व ब्रिटिशांनी स्विकारले असल्यामुळे त्यांच्या राजकीय सत्तेने भारतात शांतता व सुव्यवस्था स्थापन झाली. ना. गोखले यांनी ब्रिटिश राज्यकारभारातील अनेक दोष दाखवून इंग्लंडमध्ये अशी लोकशाही अस्तित्वात आहे. त्याप्रमाणे भारतीय जनतेला वागणूक मिळावी असे विचार मांडले. केवळ ब्रिटिश राजवटीमधील राज्यकारभाराच्या दोषांची चिकित्सा न करता त्यावर उपाय सुचविण्याचे महत्त्वपूर्ण कार्य गोखले यांनी केले.

ना. गोखले यांनी भारतीय राजकारणाला वेगळे वळण लावले. भारतीय राष्ट्रीय सभेच्या प्रमुख नेत्यापैकी ते एक होते. ब्रिटिश सरकारकडे ना. गोखले यांनी केलेल्या मागण्या हिंदुस्थानच्या विकासाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाच्या होत्या. हिंदी लोकांना कायदेमंडळात आणि स्थानिक प्रशासनात प्रतिनिधीत्व देणे, हिंदी लोकांची शैक्षणिक प्रगती घडवून आणणे, हिंदी तरुणांना प्रशासनात नोकऱ्या देणे, सार्वजनिक क्षेत्रात सर्वांना समान वागणूक देणे अशा विविध सनदशीर मागण्या करून हिंदी लोकांचा राजकीय आर्थिक व शैक्षणिक विकास घडवून आणावा अशी त्यांची विचारसरणी होती.

राष्ट्राच्या सेवेसाठी प्रामाणिक, निष्ठावंत व त्यागी भावनेने कार्य करणारे सामाजिक व राजकीय कार्यकर्ते तयार करण्याच्या उद्देशाने १२ जून १९०५ रोजी त्यानी भारत सेवक समाजाची स्थापना केली. सतत राष्ट्रसेवावृत्ती जागृत करणे ही देशाची मोठी गरज त्यांनी ओळखली व ती पूर्ण करण्यासाठी या संस्थेची स्थापना केली.

शिक्षण हा त्यांच्या आवडीचा विषय होता. १९०६ च्या अर्थ-

संकल्पावरील भाषणात सरकारने प्राथमिक शिक्षणाचा प्रसार करण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत असे आग्रहाने सांगितले. १९१० च्या मार्चमध्ये प्राथमिक शिक्षणाच्या प्रश्नावर गोखल्यांनी ठराव मांडला तेव्हा त्यानी आपले विचार जास्त सविस्तरपणे मांडले. प्राथमिक शिक्षण सक्तीचे आणि मोफत करण्याच्या दृष्टीने सरकारने पाऊल टाकावे असा ठरावाचा उद्देश होता. निश्चित योजना मांडण्यासाठी सरकारी व बिनसरकारी लोकांची समिती नेमण्यात यावी अशी सूचनाही त्यांनी केली होती. त्यांनी या विषयाचा किती सखोल अभ्यास केला होता, हे त्यांच्या भाषणावरून दिसून येते.

ना. गोखले यांचे कायदेमंडळातील कार्य महत्त्वपूर्ण वाटते. १९०२ पासून दहा वर्षे ते कलकत्ता-दिल्लीच्या वरिष्ठ कायदेमंडळात आपल्या ज्ञानाची व देशभक्तीची कर्तबगारी गाजवित राहिले आणि हळूहळू ब्रिटिश साम्राज्यातील एक विचारवंत मुत्सदी या नात्याने योग्यतेस पोहोचले. १९०२ साली म्हणजे पहिल्याच वर्षी त्यानी सरकारी जमाखर्चाच्या अंदाजपत्रकावर जे भाषण केले, त्यामुळे भारतीय जनतेच्या अंत:करणात गोखल्यांना आदराचे स्थान प्राप्त झाले. कायदेमंडळात ब्रिटिश साम्राज्यातील एक मुत्सदी विचारवंत म्हणून ते ओळखले जात असत, त्यांची तुलना ग्लॅडस्टनशी केली गेली. श्री. हॉयलड यांनी त्यांची तुलना इटालियन नेता काव्हूर यांच्याशी केली आहे. अशा या विद्वान व मुत्सदी विचारवंताचे विचार जाणून घेणे आणि त्यांच्या कार्यावर व विचारावर जास्तीत जास्त प्रकाश टाकणे या उद्देशाने मी हा विषय निवडला आहे.

१९०२ ते १९११ या काळात गोखल्यानी अर्थसंकल्पावर अनेक भाषणे दिली. त्यांच्या भाषणामुळे देशाच्या अर्थविषयक प्रश्नावर प्रकाश पडत असे. आज त्या व्याख्यानाना ऐतिहासिक महत्व असले तरी त्या वेळी त्यांच्या विषयांना तात्कालिक महत्व फार होते. करांचा डोईजड बोजा कमी करण्याची मागणी

करून राष्ट्र समृध्द करण्यासाठी जास्त खर्च करण्याची आवश्यकता त्यानी प्रतिपादक केली.

हा अभ्यास करण्यासाठी मी ग्रंथालय पध्दतीचा अवलंब केला आहे. त्यासाठी ना. गोखले यानी स्वत: लिहिलेली पुस्तके, त्यांची भाषणे व त्यांचे विविध प्रकारचे लिखाण यांचा प्राथमिक साधने म्हणून तर त्यांच्यावर लिहिली गेलेली विविध पुस्तके, लेख यांचा दुय्यम साधने म्हणून उपयोग केला आहे. हा अभ्यास करण्यासाठी मी पुढीलप्रमाणे प्रकरणांची योजना केली आहे.

पहिल्या प्रकरणांत १९ व्या शतकांतील महाराष्ट्रातील सामाजिक, आर्थिक व राजकीय परिस्थितीचा आढावा घेण्यात आला आहे. राजकीय परिस्थितीमध्ये पेशवाईचा शेवट होवून महाराष्ट्रात इंग्रजी सत्तेची स्थापना कशी झाली याचा विचार केला आहे. सामाजिक व आर्थिक परिस्थितीमध्ये शेतकऱ्यांची दुर्दशा, मध्यमवर्गाचा उदय, सामाजिक सुधारणांचे प्रश्न, स्त्री-शिक्षण, ख्रिस्ती धर्मोपदेशकांचा प्रभाव तसेच वेगवेगळ्या सुधारणेच्या चळवळी यांचा थोडक्यात आढावा घेण्यात आला आहे.

प्रकरण दोनमध्ये ना. गोखले यांच्या जन्मापासून मृत्यूपर्यंतच्या महत्त्वाच्या घटनांचा आढावा घेण्यात आला आहे. कुलवृतांत, जन्म, बालपण, शिक्षण, गोखले-रानडे भेट, सार्वजनिक सभेतील कार्य, कॉंग्रेसमधील कार्य, मुंबई विधिमंडळातील कार्य, वरिष्ठ कायदेमंडळातील कार्य, शैक्षणिक कार्य, आफ्रिकेतील कामगिरी, पब्लिक सर्व्हिस कमिशनवरील कार्य इत्यादी गोष्टींचा थोडक्यात समावेश केलेला आहे.

इस. १८८१ मध्ये गोपाळराव मुंबईमधून मॅट्रिकची परीक्षा पास झाले. मॅट्रिकनंतर गोपाळराव कोल्हापूरच्या राजाराम महाविद्यालयात दाखल झाले. शिक्षण पूर्ण केल्यानंतर जानेवारी १८८५ मध्ये सह-शिक्षक म्हणून गोखले

न्यू इंग्लिश स्कूलमध्ये रूजू झाले. सार्वजनिक सभेचे चिटणीस आणि सभेच्या त्रैमासिकाच्या संपादकत्वाची जबाबदारीही गोखल्यांनी कांही काळ सांभाळली. काँग्रेसमधील त्यांचे कार्य महत्त्वाचे होते. कांही अधिवेशाने अपवाद सोडली तर आयुष्याच्या अखेरपर्यंत बहुतेक अधिवेशनाना ते हजर राहिले. काँग्रेसच्या कामकाजात ते उत्साहाने भाग घेत असत. मुंबई विधिमंडळ तसेच वरिष्ठ कायदेमंडळातही त्यांनी महत्त्वपूर्ण कार्य केले. शिक्षण हे राष्ट्राची प्रगती करण्याचे साधन आहे असा त्यांचा विश्वास होता. शिक्षणप्रसारासाठी अनेक उपयुक्त सूचना त्यांनी सरकारला केल्या. या सर्व गोष्टींचा थोडक्यात समावेश या प्रकरणात केला आहे.

प्रकरण तीन हे भारत सेवक समाजाची स्थापना याविषयी आहे. ना. गोखले यांची भारताला सर्वात वैशिष्टयपूर्ण देणगी म्हणजे भारत सेवक समाज होय. सार्वजनिक सभेतील ना. गोखले यांचे एक जुने सहकारी शिवराम हरी साठे यांच्या हस्ते १२ जून १९०५ रोजी भारत सेवक समाजाच्या इमारतीचा कोनशिला पुण्यात बसविण्यात आला. सोसायटीचे मुख्य कार्यालय व फर्ग्युसन कॉलेज यांचे दरम्यान असलेल्या टेकडीवर संस्थेच्या पहिल्या कार्यकर्त्यांनी सेवेची शपथ घेतली. भारत सेवक समाजाच्या कार्यकर्त्यांनी मिशनरी वृतीने आपल्या राष्ट्राची व समाजाची सेवा करावी असे या घटनेच्या सरनाम्यात स्पष्ट करण्यात आले होते. सार्वजनिक जीवनात कार्य करणारे कार्यकर्ते त्यागी, नि:स्वार्थी व चारित्र्यवान असले पाहिजेत असे त्यांचे मत होते. भारत सेवक समाजाद्वारे असे कार्यकर्ते तयार करण्याचा त्यांचा प्रयत्न होता.

प्रकरण चार हे गोखल्यांचे राजकीय विचार यासंबंधी आहे. यामध्ये न्या. रानडे यांचे राजकीय विचार, ईश्वरी योगायोगाचे तत्त्वज्ञान, घटनात्मक चळवळीचा पुरस्कार, नेमस्त राजकारणाचा उदय आणि विकास, मवाळ आणि जहाल गट, अध्यात्मयुक्त राजकारण, राजकारण व माणूसकी, विद्यार्थी व

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY KOLHAPUR

राजकारण, वसाहतीचे स्वराज्य हे ध्येय, हिंदी राज्यकारभारातील सुधारणा, ना. गोखले यांचे राजकीय इच्छापत्र इ. चा थोडक्यात आढावा घेण्यात आला आहे. गोखले हे भारतीय राष्ट्रसभेतील नेमस्तवादी गटाचे नेते होते. ब्रिटिशांच्या न्यायबुध्दिवर त्यांचा विश्वास होता. म्हणूनच त्यानी सतत सनदशीर राजकारणाचा पुरस्कार केला.

प्रकरण पाचमध्ये गोखल्यांचे आर्थिक विचार स्पष्ट करण्यात आले आहेत. या प्रकरणात १९०२ ते १९१२ या काळातील भारतीय अर्थसंकल्पाचे स्वरूप, १८७५ ते १९१४ या कालखंडातील लोकवित्ताचे स्वरूप, निरनिराळ्या करासंबंधी गोखले यांचे विचार, भारतीय अर्थव्यवस्थेच्या प्रकृतीचे विश्लेषण, गोखले यांचे तत्कालीन आर्थिक यश या गोष्टींचा थोडक्यात आढावा घेण्यात आला आहे.

,......,

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR